माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : २४६/२०२०**

**अपिलार्थी, श्री. वल्लभ रमेशराव उपगडे,**
**रा. मु. पो. सिंदी (रेल्वे), ता. सेलु, जि. वर्धा.**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता,**
**लघु पाटबंधारे उपविभाग क्र. १, वर्धा.**

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**निम्न वर्धा प्रकल्प विभाग, आर्वी रोड, पिपरी (मेघे), वर्धा.**

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २२.०२.२०२२**

**अपीलकर्ता : अनुपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १३.०८.२०१९ | २९.०८.२०१९ हस्तांतरीत | १६.०९.२०१९ | १६.१०.२०१९ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी **तथा** सहायक अभियंता, लघु पाटबंधारे उपविभाग क्र. १, वर्धा यांच्याकडे दिनांक १३.०८.२०१९ रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "भूमी अभिलेख कार्यालयाने दि. ०७.०६.२०१६ रोजी केलेल्या मोजणीमध्ये शेत सर्वे नं. ५५ संपादीत आराजी ०.४८ हे.आर. दाखविण्यात आली. त्यांनतर आपले कार्यालयाने पुन:श्च 'क' प्रत मिळण्यासाठी मोजणी करावयास लावली त्यामध्ये शेत सर्वे नं. ५५ ची आराजी ०.४३ हे. आर. दाखविण्यात आली. दोन मोजणीमध्ये फरक आढळल्याने त्याचे कारण देण्यात यावे व त्याविषयी संपूर्ण कागदपत्रे देण्यात यावे. वरिष्ठ कार्यालयाचा काही पत्रव्यवहार असल्यास त्याच्या प्रती देण्यात याव्यात", याबाबतची माहिती मागितलेली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २९.०८.२०१९ रोजी कार्यकारी अभियंता, निम्न वर्धा प्रकल्प विभाग, वर्धा यांच्याकडे माहिती अर्ज हस्तांतरीत केला आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी दिनांक १६.०९.२०१९ रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी **तथा** कार्यकारी अभियंता, निम्न वर्धा प्रकल्प विभाग, आर्वी रोड, पिपरी (मेघे), वर्धा यांचेकडे “माहिती अपुर्ण दिली आहे” असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६.१०.२०१९

रोजी आपण मागीतलेली माहिती मौजा गाडेगाव येथिल भु. मा. क्रं. 21/LAQ-47/2017-18 च्या मुल्यांकन तक्ता पुरविण्यात येत असल्याने सदर अपील निकाली काढण्यात येत आहे, असे अपिलार्थीस कळविले आहे.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे दिनांक २४.०१.२०२० रोजी "माहिती अपुर्ण दिली आहे " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक २२.०२.२०२२ रोजी सुनावणी आयोजीत करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, श्री. इ. यु. शेख उपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी यांचेतर्फे उप कार्यकारी अभियंता श्री. आर. यु. भालेराव उपस्थित आहेत.

अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९(३) अन्वये दि. २४.०१.२०२० रोजी आयोगाकडे दाखल केलेल्या व्दितीय अपील अर्जावर आज झालेल्या सुनावणी दरम्यान सादर कागदपत्राचे अवलोकन व उपस्थितांचे युक्तिवाद विचारात घेता,अपिलार्थी यांनी सर्व्हे नंबर ५५/०१ व ५५/०२ या जमीनीच्या दोन वेळा करण्यात आलेल्या मोजणीमध्ये संपादीत क्षेत्रामध्ये तफावत असल्याने त्याबाबत माहिती मागीतली होती. त्याअनुषंगाने सदर सर्व्हे नं. ५५/०१ व ५५/०२ च्या जमिनीचे संपादीत क्षेत्र ०.४८आर असनु त्याप्रमाणे मला शासकीय नियमानुसार मोबदला प्राप्त झाला असल्याने त्यावर माझा कोणताही आक्षेप नाही, असे दिनांक १६.०२.२०२२ च्या पत्रान्वये सहायक अभीयंता श्रेणी -१ लघुपाटबंधारे उप विभाग कं. १ वर्धा यांना कळविले आहे. त्यामुळे अपिलार्थी यांचे माहिती अर्जानुसार मागीतलेल्या माहितीचा अनुषंगाने त्यांचे समाधान झाले असल्याचे त्यांनी लेखी दिले आहे. त्यामूळे सदर प्रकरणी कोणताही आदेश पारीत करण्याची आवश्यकता नाही. सबब प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग * नागपूर *

**(राहुल भा.पांडे)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : -२२.०२.०२२**

जावक क्रमांक 5122 दिनांक 19 AUG 2022